# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

## (सकाळ)

जा.क्र. ३३४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०१/०७/२०१८

**१) अश्लिल शब्दात शिवीगाळ केल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक ३०/०६/२०१८ चे १०.१५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी हे महाराष्ट्र सिनीयर कॉलेज सिहोरा येथे शाळा समिती सदस्य म्हणुन कार्यरत आहे यातील फिर्यादी यांना शाळा निधी पावतीची विचारणा केली असता, आरोपी लिपीक यांनी फिर्यादीला तु कोण आहेस असे म्हणुन अश्लिल शब्दात शिवीगाळ केल्याने फिर्यादी रामदास भय्यालाल चव्हाण यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम २९४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. डोंगरे पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**२) शासकीय कामात अडथडा करून अश्लिल शब्दात शिवीगाळ करून मारण्या पिठण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक ३०/०६/२०१८ चे १०.२० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा शाळेतील कार्यालयात कर्तव्यावर असतांना आरोपी हा कार्यालयात येवुन मी शाळा समीतीचा अध्यक्ष आहे. 'टीसी फिस कितनी ले रहा है शरणागत 'असे बोलालुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करून मारण्या पिठण्याची धमकी देवुन कार्यालयीन कामात अडथडा निर्माण केल्याने फिर्यादी हरीराम धनराज शरनागत वय ५७ वर्ष मुख्यधापक महाराष्ट्र हॉयस्कुल ज्युनियर कॉलेज यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम १८६,२९४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पो.ना. लिल्हारे पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**३) गैरकायदयाची मंडळी जमवुन थापड बुक्यानी मारपीट करून जखमी करून अश्लिल शब्दात शिवीगाळ करून मारण्या–पीठण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक २७/०६/२०१८ चे १४.०० वाजता दरम्यान यातील आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादी सोबत तुम्ही आपले प्लॉटवर भरण टाकले पावसाचे पाणी जात नाही यावरून भांडण करून थापड बुक्यांनी व लाथाबुक्यानी मारपीट करून फिर्यादी व त्याची आई, वडील बहिन,यांना जखमी केले व अश्लिल शब्दात शिवीगाळ करून मारण्यापीटण्याची धमकी दिल्याने फिर्यादी देवचंद किसन सुर्यवंशी वय ३४ वर्ष रा. गराडा बु. यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १४३,१४७,२९४,३२३,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. लांडे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**४) शेतात जाण्याच्या रस्त्याच्या वादावरून अश्लिल शब्दात शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक २९/०६/२०१८ चे ०८.३० ते ०९.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी त्याचे शेतातुन सार्वजनिक पाणदान रस्त्यावर आला असतांना यातील आरोपीने माझ्या शेतातुन तुझा जाण्या येण्याचा रस्ता नाही आहे. असे बोलुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करून यानंतर येथुन गेलास तर तुला जिवाने कु–हाडीने कापीन अशी धमकी दिल्याने फिर्यादी रामकृष्ण चरणदास कुरंजेकर वय ४३ वर्ष रा. दिघोरी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम २९४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. अरकासे पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

**५) शेतात लावलेली सबमर्सीबल मोटार, केबल वायर, नायलॉन दोरीची चोरी : –**

दिनांक २९/०६/२०१८ चे १८.०० ते दि. ३०/०६/२०१८ चे ०७.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी त्याचे शेतातील बोर मधील सिआरआय कंपनीची सबमर्सीबल मोटार, केबल वायर २५० फुट नायलॉन दोरी ३०० फुट असा एकुण २९,५००/रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने फिर्यादी सोंवीदा सेवकराम कनपटे वय ४७ वर्ष रा. सुकडी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. राऊत पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**६) क्षुल्लक कारणा वरून भांडण करून फावळयाने मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद : —**

दिनांक २३/०६/२०१८ चे १०.०० वाजता दरम्यान यातील जखमी शैलेश वामन राऊत वय २३ वर्ष रा.रोहणी हा त्याचे शेतात शेळया चारीत असता यातील आरोपी हा जखमीस खर्रा खाण्याकरीता आपले जवळ बोलावीले असता, खर्रा खाण्यास न आल्याने तु खर्रा खाण्यास का आला नाही असे बोलुन आरोपीने फावळा हातात घेवुन जखमीचे जवळ जावुन डाव्या हातावर फावडा मारल्याने हात सुजला आहे. असे फिर्यादी लक्ष्मण राजीराम शहारे वय ६५ वर्ष रा. रोहणी यांचे तोंडी रिपोर्ट व एक्रे– रिपार्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३२५ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तलमले पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**७) क्षुल्लक कारणा वरून पाणी पीण्याचे गळव्याने डोक्यावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद : —**

दिनांक २९/०६/२०१८ चे २२.३० वाजता दरम्यान यातील आरोपी हा लाईट बिल भरत नसल्याने जखमी फिर्यादीने त्याचे कडील लाईट बंद केले असता आरोपीने 'तु लाईट बंद का केला' असे बोलुन शिवीगाळ करून पाणी पिण्याचा गळव्याने डोक्यावर मारून जखमी केल्याने जखमी फिर्यादी निलकंठ ठाकरे वय २८ वर्ष रा. राजनी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लांखादुर येथे कलम ३२४,५०४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. उईके पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**८) लोखंडी रॉडने डोक्यावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद : —**

दिनांक ३०/०६/२०१८ चे १७.३० वाजता दरम्यान यातील आरोपी याने आज रोजी सायंकाळी १७.३० वाजता दरम्यान फिर्यादी याचा भाऊ घरून जोगी तलावा कडे जात असतांना आरोपी याने त्याचा सोबत भांडण करून भांडणात लोखंडी रॉडने फिर्यादीच्या डोक्यावर मारून जखमी केल्याने फिर्यादी आकाश नरेश मेंढे वय २५ वर्ष रा. लालबहादुर शास्त्री वार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**९) लोखंडी रॉडने डोक्यावर मारून गंभिर जखमी केल्याने गुन्हा नोंद : —**

दिनांक ३०/०६/२०१८ चे १३.०० वाजता दरम्यान यातील जखमी फिर्यादी हा हनुमान मंदीर येथुन दर्शन करून घरी परत जात असतांना रामदासजी जुबळे यांचे आटा चक्की जवळ यातील आरोपी क्र. १ याने जखमीस विनाकारण विचारपुस करून त्यास शिवीगाळ करून लोखंडी रॉडने त्याचे डोक्यावर मारून गंभिर जखमी केले व आरोपी क्र. २ व ३ यांनी काटयानी हातापायवर मारपीट केली अशा जखमी फिर्यादी शिवाजी शंकरराव तलमले वय ४० वर्ष रा. बेलघाटा वार्ड पवनी सरतर्फे फिर्यादी पोना. लांजेवार यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४,५०४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**१०) संगनमत करून लाकडी काठीने डोक्यावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद : —**

दिनांक ३०/०६/२०१८ चे १६.३० वाजता दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीचे घराचे मागील वाडीची जागा माझी आहे म्हणुन बोलले असता, भांडण व शिवीगाळ करून आरोपी क्र. २ ने लाकडी काठीने डोक्याच्या मागच्या भागाला फिर्यादीला मारून जखमी केले आरोपी क्र. १ व २ यांनी फिर्यादीची पत्नी व मुलीस ओढतान करून शिवीगाळ करून मारपीट केल्याने फिर्यादी प्रमोद मारोती नान्हे वय ३५ वर्ष रा. अडयाळ यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३२४,५०४,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. नंदेश्वर पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**११) क्षुल्लक कारणा वरून कु—हाडीने डोक्यावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद : —**

दिनांक ३०/०६/२०१८ चे १८.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा गजानन बाबा मंदिर समोरील चौकातुन त्याचे घरी जात असता, आरोपी याने त्यास पाहुण 'लक्ष्या खात्या कोठे जातो 'असे म्हटले तेव्हा फिर्यादीने त्यास असे का बोलले म्हणुन हटकले असता, आरोपीने भांडण करून फिर्यादीचे डोक्यावर कु—हाडीने मारून दुखापत केल्याने फिर्यादी लक्ष्मण सिताराम बावणे वयय ५० वर्ष रा. सेंदुरवाफा यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३२४,५०४,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परशुरामकर पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**१२) भांडण करून लाथाबुक्याने मारून जखमी करून जिवाने ठार मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक २७/०६/२०१८ चे ११.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी याने आरोपी चे शेतातुन पाणी वागविण्याचा पाईप टाकुन आले शेतात पाणी नेले असता, आरोपीने फिर्यादीस 'तु माझ्या शेतातुन पाण्याचा पाईप टाकुन का पाणी वागवीलास 'असे बोलुन शिवीगाळ, भांडण करून लाथाबुक्याने उजवे डोळयावर, ओटावर , तोंडावर मारले तसेच तुरीचे ख–याटयाने डावे हातावर मारून जिवाने ठार मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी गोलीकुमार परसराम पटले वय ३८ वर्ष रा. मासलमेटा यांचे तोंडी रिपोर्ट व एक्स–रे वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२५,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पठाण पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत

**१३) हस्तक्षेपनिय अपराध करण्याचा उद्देशाने अंधारात मिळुन आल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक २९/०६/२०१८ चे २३.३० वाजता दरम्यान यातील आरोपी हा चोरी सारखा कोणतातरी हस्तक्षेपनिय अपराध करण्याचा उद्देशाने अंधारात आपला चेहरा झाकुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. मुरकुटे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १२२(ब) भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मुटकुरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत

**१४) विजेची चोरी करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक १९/०६/२०१८ चे १४.३० वाजता दरम्यान यातील आरोपीने त्याचे घरी विज मिटर नसतांना शुध्दा त्याचे घरासमोर असलेल्या ईलेक्ट्रीक पोलच्या लघुदाब वाहीनीवर आकडा टाकुन विज चोरी करून विज वितरण कंपनीचे एकुण १९१६ युनिट कि. १७,२८०/रु. व तडजोडीचीं रक्कम एकुण २,०००/रु. असे एकुण १९,२८०/रु. चे आर्थीक नुकसान केल्याने सरतर्फे फिर्यादी यांचे विनय रामचंद्र दलाल वय ३६ वर्ष अभियंता म.रा.वि.वि. कं. शहापुर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १३५ भा. वी.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोगे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत

**१५) अल्पवयीन मलीला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक ३०/०६/२०१८ चे ०६.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्ष रा. हीला यातील संशयीत आरोपीने जने प्रेम संबधातुन पळवुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट व शासन परिपत्रक क्र. सीआरटी ०९१२/प्रक–५४ पोल–१३ दि. १०/११/२०१४ अन्वये पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३६३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. चाबुकस्वार ेलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत

**१६) उपचारादरम्यान महिलेचा मृत्यु : –**

दिंनाक २९/०६/२०१८ चे २३.३५ वाजता दरम्यान यातील मृतक सौ. सयत्राबाई बाळकृष्ण टेंभुर्णीकर वय ६० वर्ष रा. सरांडी बु. हीची प्रकृती बिघडल्याने तिला औषधोपचारा करीता सा.रू. भंडारा येथे भरती केले असता, उपचारादरम्यान २९/०६/२०१८ चे ११.४५ वा. मरण पावल्याने डॉ. मेमो वरून पो.स्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पो.स्टे.ला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. भलावी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १७४ अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुठील तपास पोहवा. ऊईके पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**.१७) अवैध हातभट्टी/देशी दारू अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक ३०/०६/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन तुमसर, साकोली व लाखांदुर येथे अवैध हातभट्टी/देशी दारू अडड्यावर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १५ लिटर हातभट्टी दारू कंमती १,५००/रु. तसेच ०४ लिटर ६८० मिलीलीटर देशी दारू किमती १,८९०/रु. असा एकुण किंमती ३,३९०/रु चा माल जप्त करण्यात आला.